जा. क्र. शिउपु/प्राशि/मान्यता/पीआर/९६/६४५७
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१. यांचे कार्यालय.
दिनांक :- 20 JUN 1996

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- शासनाकडील क्रमांक व्हीएलएस-१०९५/२२१/प्राशि-३, दिनांक ७.२.१९९६.

उपरोक्त विषया संबंधीचे शासनाकडील संदर्भाधीन पत्राचे पृष्ठांकन व्हावे.

स्थानिक गरज लक्षात घेवून खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी मराठी/उर्दू माध्यमातून जून १९९५ पासून इ. १ ते सन ९५-९६ या शैक्षणिक वर्षात सुरु असलेल्या वर्गांसह ( प्रत्येकी फक्त एक तुकडीस) फक्त शैक्षणिक वर्ष १९९५-९६ या एका वर्षासाठी प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर खास बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

एका वर्षानंतर मान्यता प्राप्त अगोदरच्या शाळांवर विपरीत परिणाम झाला आहे किंवा नाही याचा अहवाल या कार्यालयास दोन प्रतीत सादर करावा. म्हणजे त्या शाळांच्या नुतनीकरणाबाबत संबंधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणे सुलभ होईल. तसेच या शाळांतील काही ठिकाणी सुविधा उपलब्ध नसल्याचे शासनाकडून कळविण्यात आलेले आहे. तरी त्या बाबतचा अहवालही संबंधितांकडून प्राप्त करुन घ्यावा.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचेनांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम. |
|---|---|---|---|---|
| 1) | स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, भोसरी, पुणे-39 | [illegible] प्राथमिक विद्यालय, सर्वे नं. ४८ दिघी. | इ.१ ते ४ | उर्दू मराठी |

२.१ सदर संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक व्यवस्था अधिनियम १०५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

..२..

२. २ सदर संस्था ...

२. २ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२. ३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायीक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

२. ४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, शिक्षक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२. ५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे. व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

२. ६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या आद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वयीत ठेवल्या पाहिजे.

२. ७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायम शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशिरपणा नियमीतपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२. ८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२. ९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२. १० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२. ११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२. १२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधीत शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी संबंधीत शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रिय अधिकाऱ्याकडे (परवानगी दिलेल्या शैक्षणिक समाप्ति करणे) करणे बंधनकारक राहिल. अन्यथा शासनाने परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

हा परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत आपण नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करुन घेऊन नगर संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्यात बाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधीत संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [प्राथ]
जा. क्रं. जिप/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/तुकडी-
-मान्यता/७/९८३ /९९
पुणे-१ दिनांक - ३१ .५. १९९९

BOOK-POST

प्रति,
मुख्याध्यापक,
मंजुरीबाई प्राथ. विद्यालय
आदर्शनगर दिघी पुणे १५

DUE
I.P.
(1)

विषय:- मान्यता प्राप्त विना अनुदानित खाजगी प्राथ. शाळांना नैसर्गिक वाढीच्या वर्गउघडण्यास परवानगी देणे बाबत.

संदर्भ:- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्रं. प्रा/प्राशि/खाप्राशा-जा. जु. /बी. आर. -३३२० दि. १६. ३. ९९

उपरोक्त विषय व संदर्भानुसार खाली नमूद केलेल्या शाळांना त्यांचे नांवासमोर दर्शविणेत आलेल्या नैसर्गिक वाढीच्या वर्गास जादा तुकडीस जून १९९८ पासून विना - अनुदान तत्वावर मंजूरी देणेत येत आहे.

| अ.क्रं. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी नै. वाढ | मंजूर नामंजूर. |
|---|---|---|---|---|---|
| | मंजुरीबाई प्राथमिक विद्यालय आदर्शनगर दिघी पुणे-१५ | मराठी | इ. २री ते ४थीची | प्रत्येकी १ली तुकडी | मंजूर. |

शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, पुणे.

वळ/९९

२. संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्या बाबत एखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६. संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.]

७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता.

प्रत :- प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,
-------------- जिल्हा --------------.
यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत - मा. सचिव,
~~स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक~~ मंडळ भोसरी पुणे ३९
यांना माहितीसाठी अग्रेषित.